महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४६ वा | दिनांक : ३०/११/२०२५ | वार : रविवार

## वाल्मीक कराड फासावर चढेपर्यंत स्वस्थ बसणार नाही : शरद पवार गटाच्या आमदाराचा निर्धार



**बीड :** संतोष देशमुख हत्या प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा सहकारी वाल्मीक कराड याला फासावर लटकवेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केला आहे. यावेळी त्यांनी या प्रकरणातील एक फरार आरोपी कृष्णा आंधळे हा जिवंत असण्यावरही शंका व्यक्त केली. आमदार रोहित पवार यांनीही संतोष देशमुख हत्याकांडात अद्याप न्याय झाला नसल्याची खंत व्यक्त केली आहे.

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणाऱ्या संतोष देशमुख हत्याकांडाला आज २९ नोव्हेंबर रोजी बरोबर १ वर्ष पूर्ण झाले. पण आजही देशमुख कुटुंबीय व मस्साजोगच्या ग्रामस्थांचा न्यायाचा लढा संपला नाही. देशमुख कुटुंबीयांनी संतोष यांच्या स्मरणार्थ आज मस्साजोग येथे कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे, राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह अनेक छोटे - मोठे नेते उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर आमदार संदीप क्षीरसागर यांनी वाल्मीक कराडला फासावर लटकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडला फाशी होईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. आम्ही सुरुवातीलासूनच वाल्मीक कराडचा सीडीआर काढण्याची मागणी करत आहोत. सीडीआर काढल्यास त्याला या प्रकरणात कुणी कुणी मदत केली हे स्पष्ट होईल. आजही देशमुख कुटुंबीयांच्या डोळ्यांत अश्रू आहेत. ते पाहून सर्वांना वाईट वाटते. आम्ही प्रस्तुत प्रकरणात सुरुवातीपासूनच देशमुख कुटुंबीयांच्या पाठिशी आहोत, असे ते म्हणाले.

संदीप क्षीरसागर यांनी या प्रकरणातील एक फरार आरोपी कृष्णा आंधळे जिवंत असण्यावरही शंका व्यक्त केली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गतवर्षी २९ नोव्हेंबर रोजी सुदर्शन घुले व त्याच्या सहकाऱ्यांनी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यानंतर ते सर्वजण फरार झाले होते. नंतर या प्रकरणात वाल्मीक कराडचाही हात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार, पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळण्यापूर्वीच तो पुण्यात शरण आला. त्यानंतर इतर आरोपींच्याही पोलिसांनी पुण्यातून मुसक्या आवळल्या. पण कृष्णा आंधळे अजूनही पोलिसांच्या हाती लागला नाही.

मधल्या काळात तो नाशिक व पुण्यात दिसल्याच्या अफवा पसरल्या. पण त्यात कोणतेही तथ्य आढळले नाही. त्यामुळे त्याला जेरबंद करणे हे पोलिसांपुढील मोठे आव्हान ठरले आहे. त्यातच संदीप क्षीरसागर यांनी तो जिवंत असण्यावर संशय व्यक्त केल्यामुळे या प्रकरणाच्या पोलिस तपासाला धक्का बसला आहे.

## राहुल गांधींविरोधातील खटल्यात सावळा गोंधळ : सावरकर मानहानी प्रकरणात पुराव्यांची CD निघाली ब्लँक



**पुणे :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा कथित अवमान केल्याप्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात सादर करण्यात आलेली पुराव्यांची सीडी ब्लँक निघाल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. हा प्रकार गुरुवारच्या सुनावणीत घडला. पण तो आज समोर आला. या घटनेमुळे या प्रकरणी राहुल गांधींना कोर्टात खेचण्याच्या प्रयत्नांना मोठी खिळ बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये लंडनमध्ये दिलेल्या एका मुलाखतीत विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी एक कथित वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी सावरकरांचे पणतू सत्यकी सावरकर यांनी त्यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यांनी राहुल यांच्या भाषणाचे रेकॉर्डिंग असलेली एक सीडी सीलबंद लिफाफ्यात कोर्टात सादर केली होती. याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधी यांच्याविरोधात समन्स जारी केला होता. गुरुवारी न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्यापुढे सत्यकी सावरकर यांची मुख्य उलटतपासणी सुरू होती. त्यात ही सीडी मुख्य पुरावा म्हणून सादर करण्यात आली.

यावेळी कोर्टाने ही सीडी चालवून पाहण्याचे आदेश दिले. त्यानुसार ती उघडून चालवण्याचा प्रयत्न झाला. पण त्यात कोणताही डेटा नसल्याचे निष्पन्न झाले. यामुळे कोर्टरूममध्ये उपस्थित सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. सीडी कोरी निघाल्याचे पाहून सत्यकी सावरकरांचे वकील संग्राम कोल्हटकर यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी कोर्टाला आठवण करून दिली की, याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधींविरोधात कारवाई सुरू केली होती. त्यानंतर त्यांनी कोर्टाला यूट्यूबवर राहुल गांधींचे ते कथित भाषण लावण्याची परवानगी मागितली. पण कोर्टाने त्यांची विनंती साफ फेटाळून लावली.

## महाराष्ट्रात HSRP नंबर प्लेट बसवण्याची उद्या शेवटची संधी



**छत्रपती संभाजीनगर :** मध्ये 'हाय सिक्युरिटी नंबर प्लेट' (एचएसआरपी) बसवण्यासाठी आतापर्यंत ८ लाख वाहनांपैकी ३ लाख ५४ हजार ७०१ वाहनधारकांनी प्लेटसाठी ऑनलाइन बुकिंग केली आहे. त्यातील २लाख ९८ हजार ६४१ वाहनधारकांनी नंबर प्लेट बसवली आहे. बुकिंग केलेल्यापैकी ५६ हजार वाहनधारकांनाप्लेट बसवण्याचे काम सुरू आहे. नंबर प्लेट बसवण्याची मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपणार आहे. अद्याप ५ लाख वाहनांना नंबर प्लेट बसवण्याचे आव्हान आहे.

देशभरात एकाच स्वरूपाच्या वाहनांना नंबर प्लेट असाव्यात, यासाठी हा निर्णय घेतला आहे. सर्वप्रकारच्या वाहनांना नवीन सुधारित, अद्ययावत नेमप्लेट बसवावी लागणार आहे. त्यासाठी आरटीओ कार्यालयाने एजन्सी नेमली आहे. हाय सेक्युरिटी नंबर प्लेटबसवण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यासाठी ३१ मार्च २०२५ही मुदत दिली होती. मात्र, त्याला वाहनधारकांचा अल्प प्रतिसाद असल्याने ३ वेळा मुदतवाढ दिली आहे.

नंबर प्लेट बदलण्यास अद्याप मुदतवाढ आलेली नाही.सध्या मोठ्या प्रमाणात नंबर प्लेट बदलण्याचे कामबदलणे बाकी आहे. वाहनधारकांनी दंडात्मक कारवाईटाळण्यासाठी लवकरात लवकर नंबर प्लेट बदलावी.यासंबंधी राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतरपरिवहन विभाग त्यानुसार कार्यवाही करतो. - विजय काठोळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

यापूर्वी ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही नंबर प्लेट बदलणे बाकी असलेल्या वाहनांची संख्या मोठी आहे. या सर्व वाहनांवर कारवाई करणे शक्य नाही. त्यामुळे नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे नव्या नंबर प्लेट लावण्यासाठी सरकार पुन्हा एकदा मुदतवाढ देऊ शकते. सध्या यासंदर्भात सरकारकडून काही स्पष्ट केलेले नसले, तरी लवकरच प्रशासनाकडून दिशानिर्देश जारीकेले जातील, असे मानले जाते.

**तीन वेळा मुदतवाढ**
**पहिल्यांदा** : ३० एप्रिल २०२५ **दुसऱ्यांदा** : १५ ऑगस्ट २०२५ **तिसऱ्यांदा** : ३० नोव्हेंबर २०२५

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० नोव्हेंबर २०२५

# जागतिक दिव्यांग दिवस



३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिवस, विविध ठिकाणी साजरा केला जातो. दिव्यांगांना सहाय्य करण्यासाठी, शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात.स्वयंरोजगार मिळतो, नोकरीत आरक्षण मिळते.पुनर्वसनही केले जाते.तरीही यात अनेक दिव्यांग वंचितही राहतात. दिव्यांग व्यक्तींना समाजाकडून, पाहिजे तेवढे आस्था, प्रेम दिसत नाही. समाजाने आपुलकी दाखवून,दिव्यांगांना समाजाभिमुख करायला हवे. तसेच दिव्यांग व्यक्तींकडे, सहानुभूतीपूर्वक पाहिले पाहिजे. प्रेरणा,प्रोत्साहन दिले पाहिजे.आंधळ्यांची काठी, कर्णबधिरांची साद, अस्थिव्यंगाचा पाय बनून, सहकार्य केले पाहिजे. पण काही लोक ऊलट दिव्यांगाचे खोटे प्रमाणपत्र, दाखले बनवून,आरक्षणाचा व इतर योजनेचा मलिदा खात आहेत. परमेश्वराने आपणास सुदृढ शरीर का दिलेले आहे? तर ते दिव्यांगांना व्यक्तिगत सहाय्य करण्यासाठी दिले आहे. काही बेशिस्त लोकांचे शरीर सुदृढ असतांना, दिव्यांगाचे खोटे रूप धारण करून, लाभ घेतांना दिसतात. एस टी बसमधून प्रवास करणारे, हे सुदृढ लबाड व्यक्ती १/४ तिकीट काढतांना, मूकबधिराचे किंवा अस्थिव्यंगाचे रूप घेतात. हे चोर इकडे तिकडे बघत गुपचूप तिकीट काढतात. यांची प्रवृत्तीवर प्रश्न निर्माण होतात. वास्तविक ज्यांचे शरीर सुदृढ व आर्थीक परिस्थिती चांगली असतांनाही, किती केविलवाणा खटाटोप करतांना दिसतात.असे हे चुकिचा गैरफायदा घेणे महापाप आहे.खरेतर दिव्यांगाचेजवळ बसुन, त्यांच्या सपंर्कात राहून त्यांचे मनातले दुखः जाणले पाहिजे. यथाशक्तीनुसार मदत केली पाहिजे.असो शेवटी व्यक्ती तितक्याच प्रकृती, असेच म्हणावे लागेल. परंतु समाजात सगळेच सारखे नसतात. जगात दयावानही बरेच लोक आहेत. ते दिव्यांगांना मदतीचा हात देत असतात. दिव्यांग बंधूंच्या भावना,अडी-अडचणी जाणून घेतात. अमेरिकेत वास्तव्यास असलेले भारतीय व्यक्तीसुद्धा दोडाईचा परिसरातील दिव्यांग व्यक्तींना सहाय्य करीत आहेत.

तसेच गेल्या वर्षात आदरणीय ऊद्योगपती श्री. सरकारसाहेब रावल दोंडाईचा यांनी दहा दिव्यांग जोडप्यांना, प्रत्येकी ५०-५० हजार रोख दिले होते. व त्यांचा सामूहिक विवाह सोहळा,भोजनासहित आयोजित करून,शुभ आशिर्वाद देण्यास दिवसभर थांबले होते. अन् त्यांच्या सोबतची दुसरी व्यक्ती ही स्वतः दिव्यांग असुनही, दिव्यांगाना आपलेसे करणारे, डाॅ. हुसैनभाई विरदेलवाला यांचीही खुप मदत होती. तसेच सामाजिक कार्यकर्त्या डाॅ.अनुराधा सोहोनी यांचेही दिव्यांग व्यक्तींना आर्थिक व वस्तुरूप मदतीत सहभाग असतो. दुसरे म्हणजे डॉ. आर.आर.पाटील यांनी, शिंदखेडा येथे कर्णबधिरासाठी, जिल्ह्यात पहिली निवासी शाळा सुरू करून,शिक्षणाची सुविधा देऊन. कर्णबधिरांचे पुनर्वसनही केलेले आहे. दिव्यांग व्यक्तींना मदत करतांना आपुलकी असलीच पाहिजे.पुर्वीच्या काळी लोकांचा, दिव्यांगाकडे बघण्याचा दृष्टीकोन, फारच वेगळा होता.दिव्यांग व्यक्तींना तुच्छ लेखत होते. अशा विचित्र मानसिकतेच्या काळात दिव्यांगत्वावर मात करणारी, दिव्यांगांचे आराध्य दैवत, दिव्यांगांना मानाचे स्थान मिळवून देणारी, डाॅ.हेलन केलर ह्या आहेत. दि. 27 जून 1880 रोजी - अमेरिकेतील अल्बामा येथे हेलन केलरचा जन्म झाला. हेलन केलर ही एका वृत्तपत्र संपादकाची मुलगी होती. बालपणी तिला ताप आला होता.ताप येण्यापूर्वी तिची तब्येत तंदुरुस्त होती. ती चांगल्या पध्दतीने चालायची, बोलायची, ऐकायची पण अचानक आलेल्या तापाने विपरीत घडले. तिला दिसायचे परिपूर्ण बंद झाले.जगात अंधारली गेली.यातून तिची सुटका कधीच होऊ शकणार नाही. अशी परिस्थिती येऊन ठेपली. ती चिमुकली स्वतःची दृष्टी आणि श्रवणशक्ती त्या तापात गमावून बसली. अंधत्व, कर्णबधिरत्व अशा दुर्धर दिव्यांगत्वावर, ही चिमुकली जिद्दीच्या अन् आत्मविश्वासाच्या जोरावर,मात करून दाखवते.

असामान्य बुध्दी आणि चिकाटीच्या जोरावर भविष्यात विश्वविख्यात लेखिका, वक्ता बनते. दिव्यांगांच्या जगात मार्गदर्शक बनून उभी राहते. प्रत्येक दिव्यांगाच्या मनात हेलन केलर हे नाव कायमचे कोरले गेलेले आहे.हेलन केलर ह्या आलेल्या शारीरिक व्यंग परिस्थितीत, रडत न बसता, परिस्थितीवर मात करून दाखवली. हेलन केलर 7 वर्षे वयात विविध प्रकारच्या खुणा करायला शिकली व त्या खुणांद्वारे आपल्या कुटुंबियांशी संवाद साधू लागली. कधी कधी दोन व्यक्तींच्यांमध्ये उभे राहून, त्यांच्या ओठांच्या हालचाली स्पर्शातून, समजण्याचा प्रयत्न करत होती.तिच्या इतर संवेदनांचा वापर करून, स्वतःचे विश्व उभे करू लागली. आईच्या मागे-मागे जाऊन, हिंडू फिरू लागली. स्पर्शज्ञान, वास घेणे, समोरच्या व्यक्तीचा हात हातात घेऊन, ते काय करतात, याचे निरीक्षण करणे, अशा पध्दतीतून बरीच कामे करायला शिकली. माणसांच्या चेहऱ्याला स्पर्श करून, त्यांच्या कपड्यांना स्पर्श करून, माणसे ओळखायला शिकली. पायाच्या स्पर्शाने जमिनीची माती, रचना ओळखायला लागली.अॅनी सुलीव्हन नावाची एक गरीब कुटुंबातून जन्मलेली अंध महिला होती. ती बोस्टन येथील पर्किन्स अंध विद्यालयात कामाला होती. तिच्या डोळ्यांवरील दोन यशस्वी शस्त्रक्रियांनंतर अॅनी सुलीव्हनला दृष्टी पुर्ववत आली. मग शाळेमार्फत तिची, हेलन केलरला शिकविण्यासाठी, नियुक्त करण्यात आले. हेलन केलर अंध असुनही, अॅनी सुलीव्हन मॅडमचा हातात हात घेऊन, प्रत्येक शब्द साईन लॅंग्वेज शिकली. भाषावाढ करून काही वर्षातच, खुणांद्वारे अनेकाशी संवाद साधू लागली. त्याप्रमाणेच ब्रेन लिपीत लिहायला, वाचायला शिकली. हेलन केलर हिने द स्टोरी ऑफ माय लाईफ हे पुस्तक लिहले. खचून न जाता परिस्थितीवर मात केली. ही बाब सर्व सामान्य व्यक्तींना लाजवेल, असे कार्य करून दाखवलेले आहे. कर्णबधिरत्व व अंधत्व आलेले असतांना यशाचे शिखरावर हेलन केलर पोहोचल्या होत्या. यांचा आदर्श सर्व दिव्यांग बंधू-भगिनींनी व सर्व सामान्य व्यक्तींनीही घ्यायला पाहिजे. हे लेखन करणारे श्री.सुरेश मोरे. हे सुध्दा, दिव्यांग व्यक्तींना सहानुभूती देऊन, नियमित मार्गदर्शन करतात. यांचेमते दिव्यांग व्यक्ती ही जीवनात येऊन खचलेली असते. म्हणून परिसरातील लोकांनीही, दिव्यांग व्यक्तिंना सहानुभूतीपूर्वक सहकार्य केले पाहिजे. असे ह्या लेखातून सांगण्याचा छोटासा प्रयत्न केलेला आहे.

**लेखन- श्री. सुरेश मन्साराम मोरे**
(सेवानिवृत्त शिक्षक)
खर्दे बु.ता.शिंदखेडा
९८९०६२०९१७

## ज्येष्ठ शिक्षिका सुनीता पाटील यांचा स्नेहपूर्ण सत्कार समारंभ उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील ज्येष्ठ आणि कार्यतत्पर शिक्षिका श्रीमती सुनीता सुनील पाटील यांच्या सेवापूर्तीचा कार्यक्रम आज अतिशय उत्साहपूर्ण आणि स्नेहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दीर्घ सेवाकाळात शाळेच्या एकूण शैक्षणिक प्रगतीत तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मॅडमचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यशैली, विद्यार्थ्यांवर केंद्रित शिकवणूक पद्धती आणि शाळेप्रती असलेले निष्ठावान समर्पण याचा गौरव करण्यासाठी हा समारंभ आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी हे उपस्थित होते. विद्यालयातील सर्व शिक्षकवर्ग व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत श्रीमती सुनीता पाटील मॅडमचा पुष्पगुच्छ, शाल, देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून पाटील मॅडमच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या आगामी जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## अंकुश गरूड यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारे इतिहास विषयात अंकुश बुद्धिवंत गरूड यांना "उस्मानाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा ऐतिहासिक अभ्यास" या शोध-प्रबंधासाठी पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. यांनी डॉ. जी. एन. सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा शोध-प्रबंध सादर केला होता. उस्मानाबाद जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, कृषी आणि खाद्य इ. पर्यटन स्थळांचा इतिहास व स्थानिक पर्यटन स्थळांच्या विकासासाठी शासन स्तरावरून होणाऱ्या प्रयत्न इ. महत्त्वपूर्ण गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे आई-वडिल, मार्गदर्शक- जी. एन. सोमवंशी, प्रो. किसन अंबाडे, प्रो. गीतांजली बोराडे मॅडम, डॉ. एस. आर. बिरादार आणि डॉ. विलास खंदारे इ. नी अभिनंदन केले आहे.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० नोव्हेंबर २०२५


## माणसाने वागायचे कसे ?

जो सत्यावर करतो प्रहार
अन्याविरुद्ध उठवतो आवाज
अन् न्यायासाठी झगडतो
हल्ली तोच माणूस
सगळयात वाईटअसतो

जो खोट्याबरोबर राहतो
अन्याय,अत्याचार करणा-याला
साथ देतो
स्वार्थ,लाचारी, गुलामी स्वीकारतो
हल्ली तोच माणुस
सगळयात चांगला असतो

हल्लीच्या काळात
माणुस जो खोटा
तो मोठा असतो
माणुस जो सत्य
तो खोटा असतो

मग तुम्हीच सांगा
सत्याने जगायचे कसे ?
हल्लीच्या जगात
माणसाने माणसात
वागायचे कसे ?




**प्रा. डॉ. सतीश मस्के,**
पिंपळनेर जि.धुळे
मो.९४२३३९७४८४


## संत बहिणाई

कन्नड भूमीची!लेक अनमोल!
काळजात ओल!बहिणाई!!

वारकरी संत !वारकरी पंथ!
पांडुरंग भक्त !बहिणाई !!

बारा या जन्माचे !स्मरण संचित!
सांगे अभंगात! बहिणाई!!

संतकृपा होता !गुरु तुकाराम!
जीवनात राम!बहिणाई!!

सातशे बत्तीस !अभंग ओवीत!
वेदांच्या सारात! बहिणाई !!

दु:ख वेदनेचा!धागा अभंगात!
मर्म जीवनात ! बहिणाई!!

साधी बोलीभाषा!अभंग
लाभली!
हृदया भिडली!बहिणाई!!

क्षेत्र शिऊरात!ध्वजा कीर्तिवंत !
झाली समाधिस्थ ! बहिणाई!!




**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड
मो.9403384889


## वंचित, उपेक्षितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे मुक्त विद्यापीठ : डॉ. नंदकुमार राठी





**परळी (प्रतिनिधी) :** जवाहर शिक्षण संस्थेच्या वैद्यनाथ कॉलेजमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नवीन अद्यावत कक्षाचे उद्घाटन विभागीय केंद्र,छत्रपती संभाजीनगरचे विभागीय संचालक,डॉ. नंदकुमार राठी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी याप्रसंगी बोलतांना वंचित,उपेक्षितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे विद्यापीठ म्हणजे मुक्त विद्यापीठ असे उद्गार याप्रसंगी काढले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्रप्रमुख डॉ. जे व्ही जगतकर, प्रमुख पाहुणे जवाहर शिक्षण संस्थेचे सचिव, मा. श्री दत्ताप्पा इटके, नवीन कक्षाचे उद्घाटक विभागीय संचालक, डॉ नंदकुमार राठी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. आंधळे, वाणिज्य विभागाचे माजी विभाग प्रमुख एस जी गिराम,केंद्र संयोजक डॉ.बाबासाहेब शेप, केंद्र सहाय्यक डॉ आर डी राठोड यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र संयोजक डॉ.बी.के. शेप, कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अभ्यास केंद्राची पार्श्वभूमी सांगून अभ्यास केंद्राची कशी प्रगती झाली याचा आढावा थोडक्यात सांगितला. तर या कार्यक्रमाचे उद्घाटक विभागीय संचालक, डॉ. नंदकुमार राठी यांनी महाविद्यालयाचे निसर्गरम्य वातावरण व महाविद्यालयातील भौतिक सुविधा पाहून माझे मन बहरून गेले. अशा महाविद्यालयामध्ये अजून नवीन कोर्स घेणे आवश्यक आहे, त्यासाठी संस्थेने व केंद्रप्रमुख यांनी प्रयत्न केले तर विद्यापीठचे आणखी विविध कोर्स व शिक्षणक्रम देण्यासाठी मी शिफारस देखील करतो असे सांगून यूजीसीच्या नियमानुसार कोणताही विद्यार्थ्यांना दोन पदवी घेता येतील अशा पद्धतीचा निर्णय झालेला आहे. या संधीचा फायदा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा. व महाविद्यालयाने देखील नवीन कोर्स घेण्यासाठीचा प्रस्ताव आमच्याकडे दाखल करावेत असे मत या प्रसंगी व्यक्त केले. संस्थेने अभ्यासकेंद्राला नवीन कक्ष दिल्याबद्दल संस्थेचे याप्रसंगी कौतुक केले. अभ्यास केंद्राची केंद्रप्रमुख तथा प्राचार्य डॉ जे व्ही जगतकर यांनी अभ्यास केंद्रासाठी संस्थेने नवीन कक्ष उभारण्यासाठी परवानगी दिली त्यामुळेच आम्ही अत्याधुनिक कक्ष उभा करू शकलो त्याबद्दल संस्थेचे आभार मानले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जवाहर शिक्षण संस्थेचे सचिव,मा. श्री. दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी आम्ही आमच्या संस्थेअंतर्गत महाविद्यालयांमध्ये नवनवीन कोर्स घेण्याचा प्रयत्न करू आणि ते चांगल्या प्रकारे चालविले जातील. तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी देखील आमचे महाविद्यालय सातत्याने प्रयत्न करत असते. असे मत याप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, समंत्रक, व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यास केंद्रातील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप गायकवाड यांनी केले तर आभार केंद्र सहायक डॉ. आर. डी. राठोड यांनी मानले.

## मनपा केंद्रीय विद्यालयात पालकसभा उत्साहात पार - शैक्षणिक प्रगतीवर सविस्तर चर्चा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ (शनिवार) रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या वेळेत इयत्ता पहिली ते दहावीतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची पालकसभा आयोजित करण्यात आली होती. मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांनी पालकांशी संवाद साधत खालील बाबीवर चर्चा केली; विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थिती, शैक्षणिक प्रगती; इयत्ता ५वी व ८वी शिष्यवृत्ती परीक्षेची आणि १० वी बोर्ड परीक्षेची विशेष तयारी बाबत माहिती. शाळेतील अनुशासन व वर्तणूक, गणवेश, स्वच्छता यावर भर दिला. विद्यार्थ्यांना क्रीडा, चित्रकला, वक्तृत्व, नृत्य यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन. शाळेतर्फे “वाचाल तर वाचाल” मोहीम; प्रत्येक विद्यार्थ्याने आठवड्यात किमान एक पुस्तक वाचावेतसेच आगामी शैक्षणिक उपक्रम याबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक–शिक्षक संवादाचे महत्त्व, गृहपाठाचे नियोजन, आणि विद्यार्थ्यांच्या मोबाइल वापरावर नियंत्रण यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० नोव्हेंबर २०२५


## बौद्ध कला, स्थापत्य, पुरातत्व व अध्ययनामध्ये उत्कृष्ट योगदानाबद्दल डॉ. संजय पाईकराव यांना सन्मानपत्र प्रदान



**सांची :** येथील बुद्धिस्ट-इंडिक स्टडीज विद्यापीठ, सांची, रायसेन, मध्य प्रदेश येथे दि.२३-२५ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या इंडियन सोसायटी फॉर बुद्धिस्ट स्टडीच्या 25 व्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये बौद्ध कला, स्थापत्य,पुरातत्व व अध्यानांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल नांदेडचेभूमिपुत्र व सध्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती डॉ. संजय पाईकराव यांना विशेष सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. इंडियन सोसायटी फॉर बुद्धिस्ट स्टडीजच्या उद्दिष्टांमध्ये आणि त्यांच्या प्रगतीमध्ये समर्पित सेवा, विद्वत्तापूर्ण वचनबद्धता आणि मौल्यवान योगदान दिल्याबद्दल डॉ. संजय पाईकराव यांना आदर आणि शैक्षणिक मान्यता प्रदान केली जात आहे. २५ व्या वार्षिक परिषदेचा भाग म्हणून रौप्य महोत्सवी उत्सवाच्या महत्त्वपूर्ण प्रसंगी, सोसायटी बौद्ध अभ्यास, संशोधन आणि बौद्धिक देवाणघेवाणीच्या प्रचारात तुमच्या सातत्यपूर्ण सहभागाचे आभार मानते. तुमच्या शैक्षणिक सहभागामुळे आणि सततच्या पाठिंब्याने बौद्ध धर्माच्या शिकवणी, तत्वज्ञान आणि सांस्कृतिक वारशाची सखोल ओळख निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, ज्यामुळे सोसायटीच्या विद्वत्तापूर्ण कार्यांना समृद्धी मिळाली आहे.इंडियन सोसायटी फॉर बुद्धिस्ट स्टडीज तुमच्या समर्पणाबद्दल मनापासून आभार व्यक्त करते आणि तुमच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रयत्नांमध्ये तुम्हाला यश मिळावे अशी शुभेच्छा देते. डॉ. संजय पाईकराव हे इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे अतिथी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.ते मागील 15 वर्षांपासून इतिहास, पुरातत्व व जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या हे विषय शिकवितात. त्यांचे बौध्द मुर्ती, कला, स्थापत्य व आंबेडकरी चळवळीचे इतिहास लेखन हे विशेषीकरण आहे.त्यांचे 50 शोध निबंध विविध नामांकित शोध पत्रिकेत व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरीय परिषदांमध्ये प्रकाशित आहेत. ते इंडियन सोसायटी फार बुद्धिस्ट स्टडी, जम्मु कार्यकारणीचे सदस्य आहेत. कार्यकारणी सदस्य, द प्लेसनेम सोसायटी ऑफ इंडिया,म्हैसूर ,अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे निमंत्रित सदस्य आहेत.मराठवाडा इतिहास परिषदेचे सहसचिव म्हणून कार्य करित आहेत. मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे सदस्य सचिव आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सहसचिव आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठातील व शहरातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## जातीनं पेटलेल्या घरांची राखरांगोळी”

काय मिळवलं त्याची हत्या करून,
हा प्रश्न अजूनही धगधगत राहिलाय…
दोन घरं होरपळून गेलीत,
दोन आईंचे संसार उदध्वस्त झालेय…

जग उडतंय चंद्रावर,
आणि आपलं गाव अजून दलदलीत रुतलंय…
काळ बदललाय म्हणे,
पण काहींचं मेंदू अजूनही अंधारातच
घुटमळतंय— न रुतलंय, न सुटलंय.

कुटुंबं मोडली, जीव गेलेत,
रक्तानं माती ओली चिंब झालीय…
आणि वर बसलेले काही महामूर्ख
जात—पातीतच उगाच भडकून फुगलेत—
जणू त्यांच्या बुद्धीला कुणीतरी कुलूपच ठोकलंय.

काय रान पेटवताय रे तुम्ही?
जात वगैरे कधी शेतात पेरलीये?
ना ती भाकरीत येते,
ना पाण्यात विरघळते,
ना रडणाऱ्या आईचं दुःख पुसते!

माणूसपण जिवंत ठेवा रे,
तेच हरवून सगळं उध्वस्त होतंय रे…
दोन कुटुंबं गेली तर,
पूर्ण गावाच्या छातीत आग पेटत असतेय—
त्या आगीचे नाव जात नाही;
फक्त वेदना म्हणतात तिला!

थोडं डोकं वर करा,
जगाच्या दिशेनं पाहा…
जग पुढं पळतंय,
आणि आपण?
आपण अजूनही स्वतःला जाळणाऱ्या
जातबुजर्गीच्या धुरातच
धापा टाकत फिरतोय —
हेच खरं दुःख आहे!
हेच खरं दुःख आहे….

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर


**जाहिरात दर**

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० नोव्हेंबर २०२५

# रासायनिक युद्धातील सर्व बळींसाठी आंतरराष्ट्रीय स्मरणदिन : मानवतेच्या अदृश्य वेदनांचा समाजशास्त्रीय साक्षात्कार

**मा**नवजातीचा इतिहास हा प्रगतीचा, वैज्ञानिक उन्नतीचा, संस्कृती-सभ्यतेच्या निर्मितीचा इतिहास आहे असे आपण अभिमानाने म्हणतो. पण या इतिहासामध्ये ज्या रक्तरंजित पानांनी काळाचे स्मारक झाले आहेत, त्यात युद्धाचा अध्याय सर्वाधिक भयानक आहे. शस्त्र, सत्ता आणि सीमा यांसाठी झालेल्या संघर्षांनी अनेक पिढ्यांची स्वप्ने, संस्कृती, अस्तित्व आणि भविष्य नष्ट केले आहे. मात्र युद्धाच्या विकासामध्ये एक टप्पा असा आला, ज्याने मानवजातीसमोरील नैतिकतेचा पाया हादरवला तो टप्पा म्हणजे 'रासायनिक युद्ध' (Chemical Warfare) होय. आज ३० नोव्हेंबर हा दिवस जगभरात “रासायनिक युद्धातील सर्व बळींसाठीचा आंतरराष्ट्रीय स्मरणदिन” (International Day of Remembrance for All Victims of Chemical Warfare) म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ शोक व्यक्त करण्याचा नाही, तर एका संपूर्ण सभ्यतेच्या नैतिकतेचा पुनर्विचार करण्याचा आहे. हा दिवस आपल्याला विचार करायला भाग पाडतो की विज्ञानाचा उपयोग विकासासाठी आहे की विनाशासाठी? सत्ता, साम्राज्यवाद, भू-राजकीय हितसंबंध आणि वर्चस्व सिद्ध करण्यासाठी मानवाने कोणत्या हद्दी गाठल्या आहेत?रासायनिक युद्धाचा उगम पहिल्या महायुद्धापासून दिसतो.

१९१५ मध्ये बेल्जियममधील रणभूमीवर जर्मन सैन्याने क्लोरीन गॅसचा वापर केला आणि जगाने पहिल्यांदा पाहिले की मानवांना मारण्यासाठी अदृश्य शस्त्रेही तयार होऊ शकतात. क्लोरीन, मस्टर्ड गॅस, फॉस्जीन, सारिन, टॅबून, व्ही एक्स आणि इतर नर्व्ह साधनांनी लाखो सैनिक आणि निरपराध नागरिकांचे जीवन अकल्पनीय पद्धतीने उद्ध्वस्त केले. हे शस्त्र फक्त शरीराला मरण देत नाही, तर समाजाला पिढ्यान्पिढ्या अपंगत्व, कर्करोग, न्यूरोलॉजिकल बिघाड, मानसिक आघात, पर्यावरणीय नाश आणि सामाजिक विस्थापनाचे भयानक ओझे वाहण्यास मजबूर करते.समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून पाहिल्यास रासायनिक युद्ध ही केवळ सैनिकी प्रक्रिया नसून सत्तेची पुनर्निर्मिती, भीतीचे सामाजिक संस्थात्मककरण आणि मानवी अस्तित्वावर अधिराज्य गाजवण्याची अमानवी प्रवृत्ती आहे. कार्ल मार्क्सच्या मते, सत्ता आणि साधनांचे केंद्रीकरण हे वर्गसंघर्ष निर्माण करते. रासायनिक शस्त्रांची निर्मिती आणि नियंत्रण हा जागतिक सत्ताव्यवस्थेतील वर्गीय वर्चस्वाचा विस्तार आहे. येथे राष्ट्रे आणि साम्राज्ये ही 'वरची सत्ता' आहेत, तर बळी पडणारी माणसे, अल्पसंख्याक, गरीब देश, निर्वासित, स्त्रिया आणि मुले ही 'शोषित वर्ग' आहेत.रासायनिक युद्धाचा सर्वात भयानक परिणाम हा मानव देहावर दिसणाऱ्या जखमांपेक्षा मनावर उमटणाऱ्या अदृश्य जखमांमध्ये जास्त आढळतो. अनेक संशोधन दर्शवतात की रासायनिक हल्ल्यातून वाचलेल्या लोकांना आयुष्यभर नैराश्य, सामाजिक अविश्वास, ओळख गमावल्याची भावना आणि सामाजिक अलगाव अनुभवावा लागतो. युद्धानंतर समाजाच्या पायाभूत व्यवस्था, आरोग्य प्रणाली, उपजीविका, शिक्षण आणि कुटुंब व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत होते. अशा परिस्थितीत समाज पुनर्बांधणी करणे ही केवळ आर्थिक नव्हे तर भावनात्मक आणि सांस्कृतिक पुनर्रचना असते.

लिंगाच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास रासायनिक युद्धाचे परिणाम आणखी विषम दिसतात. स्त्रिया केवळ शारीरिकदृष्ट्या नव्हे तर सामाजिकदृष्ट्या अधिक बळी ठरतात. त्यांच्या शरीरावर रासायनिक दुष्परिणामांमुळे प्रजनन समस्या, गर्भपात, बालकांमध्ये जन्मजात दोष, वंध्यत्व आणि अनेक अदृश्य आजार उद्भवतात. युद्धानंतर समाजात असुरक्षितता वाढते आणि स्त्रियांवरील लैंगिक हिंसा, मानव तस्करी, जबरदस्तीचे विवाह आणि सामाजिक बहिष्काराचे प्रमाण वाढते. त्यामुळे रासायनिक युद्ध हा फक्त आंतरराष्ट्रीय सुरक्षेचा विषय नाही तर स्त्री-अधिकार, मानवाधिकार आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.पर्यावरणीय समाजशास्त्राच्या दृष्टीने रासायनिक युद्धाचा प्रभाव आणखी खोलवर जातो. विषारी रसायनांनी जमीन, पाणी आणि हवा प्रदूषित होते. शेती नष्ट होते, अन्नश्रृंखला बदलते, जैवविविधता नष्ट होते आणि परिणामी पर्यावरणीय असमानता निर्माण होते. गरीब राष्ट्रे आणि आदिवासी समाज हे अशा प्रदूषणाचा सर्वाधिक फटका बसणारे घटक असतात. हेच 'पर्यावरणीय अन्याया' चे ज्वलंत उदाहरण आहे.मानव इतिहासाने दु:खातून शहाणपणा शिकला असे अनेकदा म्हटले जाते, परंतु रासायनिक शस्त्रांच्या संदर्भात ही म्हण पूर्णपणे खरी दिसत नाही. १९९७ मध्ये Chemical Weapons Convention आणि नंतर Organization for the Prohibition of Chemical Weapons ची स्थापना झाली. जगातील १९० पेक्षा अधिक देशांनी रासायनिक शस्त्रबंदी संधी करारावर स्वाक्षरी केली. तरीही सीरिया, इराक-इराण युद्ध, जपानमधील टोकियो मेट्रोवरील सारिन हल्ला, आणि अलीकडच्या भौगोलिक राजकीय तणावामध्ये रासायनिक शस्त्रांचा वापर होत असल्याच्या घटना जगाला पुन्हा धोक्याची जाणीव करून देत आहेत.समाजशास्त्र म्हणते की कायदे आणि धोरणे महत्त्वाची आहेत, पण समाजाची सामूहिक नैतिकता, संवेदनशीलता आणि सहभाग शिवाय बदल शक्य नाही. रासायनिक युद्ध थांबवण्याची लढाई केवळ सीमारेषांवर नव्हे तर शाळांमध्ये, विद्यापीठांमध्ये, आंतरराष्ट्रीय चर्चेमध्ये, धोरणनिर्मितीत, आणि मानवाधिकारांच्या जागरुकतेमध्ये लढली जात आहे.आज या स्मरणदिनी आपण ज्या लोकांना आदर अर्पण करतो ते केवळ मृत नाहीत तर ते इतिहासाचे साक्षीदार, अन्यायाविरुद्धची चेतावणी आणि मानवतेच्या भवितव्याचा आरसा आहेत. त्यांच्या स्मृती आपल्याला सांगतात की तंत्रज्ञान वाढले, विज्ञान प्रगत झाले, पण मानवता पुरेशी प्रगत झाली आहे का? या दिवशी आपण केवळ स्मरण करत नाही तर आपण स्वत:ला विचारतो की “युद्ध जिंकून काय मिळते, जर आपण मानवता हरवतो?” रासायनिक युद्धाच्या इतिहासातील प्रत्येक मृत्यू एक प्रश्न विचारत आहे की “विज्ञानाचा उद्देश निर्मिती आहे की विध्वंस?”आज आपण त्या सर्वांना श्रद्धांजली देऊया ज्यांनी या क्रूर युद्धाचे बळी म्हणून जग सोडले आणि त्या सर्वांना आधार देऊया जे अजूनही जिवंत आहेत पण मृत्यूइतक्याच वेदनांनी जगत आहेत. ही मानवतेच्या पुनर्जागरणाची हाक आहे. आणि या हाकेतून उमटणारा एकच संदेश आहे की “रासायनिक युद्ध नव्हे, मानवी शांती हीच खरी जागतिक विजयाची ओळख आहे.”



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. ९९६०१०३५८२, ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

